बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतूदीनूसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१४-१५ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशातु-२०१५/.प्र.क्र. ४४/१५/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांकः १० मार्च, २०१६

वाचा-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि. १५/११/२०११
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१३) / प्राशि-३, दिनांक २/७/२०१३
३) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशधो-२०१४/(१८१/२०१४) एसएम-५ दि. २४/०३/२०१५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१२) प्राशि-३ दि. १३/२/२०१३
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः -एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ / टिएनटी-२, दिनांक २८/८/२०१५
६) शासन पत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/ टिएनटी-२ , दिनांक ७/९/२०१५
७) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- प्राशिसं/ इ.८वी -५ वी/ २०१५/ड- ५१२ (अ)१ , दिनांक ४/३/२०१५
८) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ ५१९४/५१२ (अ)१ /२८२२, दिनांक २४/६/२०१५
९) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ इ.५वी ८ वी वर्ग/ ५१२ (अ)१ /४५५०, दिनांक १५/९/२०१५
१०) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ ५१२ (अ)१ /४८५३, दिनांक ५/१०/२०१५
११) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/५१२ (अ)१ /५२७२, दिनांक १९/१०/२०१५
१२) शासन पत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: आरटीई-२०१५/प्र.क्र.५०/१५/एसएम-५ , दिनांक ७/७/२०१५

प्रस्तावना- १.१ केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींनुसार इयत्ता १ ली ते

मुख्याध्यापिका
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले कन्याशाळा
राजगुरुनगर,ता.खेड.जि.पुणे.पिन-४१०५०५

४) या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या अतिरिक्त वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अमंलबजांवणी करण्यात येईल.

५) तसेच संदर्भाधिन क्र. (५) येथील दिनांक २८ ऑगस्ट,२०१५च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक वाढ बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ५वी नंतर तसेच इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढ लागू राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१०१६१०१४२५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant
Sudhakar
Pathak

Digitally signed by Hemant Sudhakar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03048473905e, serialNumber=ee03447853a43cf2a3547cbc186e49602a70ef183cf488073e81785e6ad171a6, cn=Hemant Sudhakar Pathak
Date: 2016.03.10 16:16:27 +05'30'

(हे.सु.पाठक)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), यांचे स्वीय सहाय्यक,
३) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे,
४) शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परीषद,
७) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
८) मुख्याधिकारी,सर्व नगरपरिषद/नगरपालिका,
९) सर्व शिक्षणाधिकारी(प्राथमिक), सर्व जिल्हा परिषद,
१०) सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुंबई, महानगरपालिका,
११) निवडनस्ती-(एसएम-५).

इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण "प्रारंभिक शिक्षण" म्हणून संबोधण्यात येते. संदर्भाधीन क्र.(४) येथील शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतचे शिक्षण " प्राथमिक" व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण "उच्च प्राथमिक" शिक्षण अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यास्तव इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरानुरुप व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक स्तरानुरुप दर्जाप्रमाणे अध्यापन करणे आवश्यक आहे.

१.२ उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन प्राथमिक शिक्षण प्रणाली (Elementary Cycle) पूर्ण होण्याचे दृष्टीने तसेच राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला नजीकच्या शाळेत इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळेला इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या शाळेला इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास संदर्भाधीन क्र.(१२) येथील शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राधिका-यांच्या / सनियंत्रण अधिका-यांच्या शिफारशीसह शासनास सादर करावयाचे निर्देश देण्यात आले होते. या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र. (७) ते (११) येथील पत्रान्वये राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास मान्यता देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय-</u>

राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून सोबत दर्शविल्याप्रमाणे सहपत्र अ, ब,क व ड नुसार इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच सहपत्र इ, ई, उ व ऊ नुसार राज्यातील इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे. या वर्गांचे वाटप शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावे.

१) शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

२) या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आलेले आहे त्या शाळांची पट संख्या विहीत निकषांप्रमाणे असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०७ | सौ. राणूबाई नागुबाई बारणे प्रशाला भोरडेनगर , थेरगांव , पुणे | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| १०८ | क्रांती ग्रामीण विकास मंडळाचे विजय बालविकास मंदीर, बांदलवाडी ता. बारामती जि. पुणे | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| १०९ | साई एज्युकेशन सोसायटी संचलित क्रांतीज्योती फुले कन्याशाळा, पानमळा, राजगुरूनगर ता.खेड जि.पुणे. | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा जळगाव | | | | |
| ११० | ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा, आदर्श नगर हिरापूर रोड, चाळीसगाव जि.जळगाव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| १११ | कै.सौ.सुवर्णाताई देशमुख प्राथमिक विद्यामंदीर, हरीओमनगर चाळीसगंव जळगांव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११२ | कै.श्रीमंत सौ.माणिकराजे शिवराम पवार, विश्वासराव एज्युकेशनल ॲन्ड हिस्टॉरीकल टर्स्ट , नगरदेवळा संचलित प्राथमिक विद्यामंदीर कोंडवाडा गल्ली, पाचोरा,जि.जळगांव. | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११३ | पं. दिनदयाल उपाध्याय शिक्षण प्रसारक मंडळ,जामनेर ,जि.जळगांव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११४ | साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, चाळीसगांव जिल्हा जळगांव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११५ | विवेकानंद विद्या मंदीर, लक्ष्मीनारायण नगर,भुसावळ,जि.जळगांव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११६ | तुळजाई शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक विद्या मंदीर, बाहेरपुरा, पाचोरा, जळगाव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११७ | तुळजाई शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक विद्या मंदीर, जनता वसाहत, पाचोरा, जळगाव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११८ | तुळजाई शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक विद्या मंदीर,कृष्णापूरी, पाचोरा, जळगाव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ११९ | एकलव्य प्राथमिक विद्यामंदीर शिवाजी नगर जामनेर ता.जामनेर जि. जळगाव | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा नाशिक | | | | |
| १२० | प्रयती शिक्षण संस्था संचलित प्राथमिक विद्या मंदीर,अभिमन्यु नगर, सटाणा, ता. बागलाण, नाशिक | मराठी | ८ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा नंदुरबार | | | | |



मुख्याध्यापिका
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले कन्याशाळा
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.पिन-४१०५०५